गीत ः अंगणी माझ्या अल्बम ः पाऊस

गायिका ः वैशाली सामंत गीत ः चंद्रशेखर सानेकर संगीत ः अवधूत गुप्ते

अंगणी माझ्या मनाच्या मोर नाचु लागले
दाटुनी आभाळ आले मेघ बरसू लागले
अशा चिंब ओल्या क्षणी पुकारे तुझी साजणी
अशा चिंब ओल्या क्षणी पुकारे तुझी साजणी

चांदिची ही थेंबफुले या माळुनी येती सरी
आणि मातीच्या गंधाने भरती झरझर घागरी
धुंद नाचती उन्मनी पुकारे तुझी साजणी
अशा चिंब ओल्या क्षणी पुकारे तुझी साजणी

सा रे म प रे म प नी...सा
सा नी प म रे नी रे सा
गार वारा मन भरारा शिरशिरी देही उठे
हा असा पाऊस आणि मी तुला शोधु कुठे
खोड ही तुझी रे जुनी पुकारे तुझी साजणी
अशा चिंब ओल्या क्षणी पुकारे तुझी साजणी

अंगणी माझ्या मनाच्या मोर नाचु लागले
दाटुनी आभाळ आले मेघ बरसू लागले
अशा चिंब ओल्या क्षणी पुकारे तुझी साजणी